आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 15/07/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 156 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# "नोटिशीमध्ये तथ्य नाही", आम्ही कायदेशीर सल्ला घेऊ - सुनील तटकरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या निवडीवरच आक्षेप घेण्यात आला आहे. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सचिनानंद सिंह यांनी याबद्दल आक्षेप घेत निवड प्रक्रियाच रद्द करण्याची मागणी केली. या मागणीने पक्षात खळबळ उडाली असून, यावर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी भाष्य केले आहे.**

सुनील तटकरे माध्यमांशी बोलताना म्हणाले की, "नोटिशीमध्ये तथ्य नाही. राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसाठी घेण्यात आलेली बैठक नियमानुसारच होती. तरीही आम्ही यासंदर्भात कायदेशीर सल्ला घेऊ. माहिती घेऊ आणि नंतरच कारवाई करू."

राष्ट्रीय सरचिटणीस असलेल्या सचिनानंद सिंह यांच्याबद्दल तटकरे म्हणाले की, "माझ्या संबंधित व्यक्तीसोबत संवाद नाही. दिल्लीत कोणाचा झाला असेल, तर माहिती नाही. पण, कायदेशीर वैधता तपासावी लागेल. मला व्यक्तिगत वाटत नाही, यात काही तथ्य असेल."

सुनील तटकरे म्हणाले, "एकत्रित बसून राष्ट्रीय अध्यक्षांची निवड झालेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंघपणे सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करतोय. लोकशाही मार्गाने आम्ही काम करतोय, कोणी कोणाबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचे कारण नाही."



# मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मोठी कारवाई

## प्रकल्प प्रमुख व सेफ्टी अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी युनूस खतीब**

**मोशी येथील कचरा डेपो परिसरात 8 जुलै रोजी घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी अखेर एमआयडीसी भोसरी पोलिसांनी मोठी कारवाई करत ॲटोनी लारा रिन्युएबल एनर्जी प्रा. लि. कंपनीचे प्रकल्प प्रमुख अशोककुमार गुप्ता आणि सेफ्टी अधिकारी विजय सपकाळ यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाळ्यात एसएलएफ (Sanitary Landfill) परिसराची नियमित तपासणी करणे, संभाव्य धोके टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे आणि कामगारांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे ही संबंधित कंपनीची जबाबदारी होती. मात्र, आवश्यक खबरदारी न घेतल्याने एसएलएफचा काही भाग कोसळून इमारत आणि लगतच्या रस्त्यावर ढिगारा पडला.

या दुर्घटनेत नऊ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले.

महापालिकेच्या वतीने दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 105, 125 (अ), 125 (ब) आणि 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दुर्घटनेमागील निष्काळजीपणा, सुरक्षा नियमांचे उल्लंघन आणि जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

या प्रकरणामुळे मोशी कचरा डेपोतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मृत कामगारांच्या कुटुंबीयांकडून दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# डेंग्यू, मलेरियाविरुद्ध महापालिकेची व्यापक प्रतिबंध मोहीम

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून शहरभर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता, जनजागृती आणि डास नियंत्रणाच्या विविध मोहिमा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.**



पावसाळ्यात साचलेले पाणी, अस्वच्छ परिसर तसेच दूषित अन्न व पाण्यामुळे संसर्गजन्य आजारांचा प्रसार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचणार नाही याची काळजी घेणे, पिण्याचे पाणी उकळून किंवा शुद्ध करून वापरणे तसेच अन्नपदार्थ नेहमी झाकून ठेवावे असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले.

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पाण्याच्या टाक्या, कुलर, फुलदाण्या, टायर तसेच इतर पाणी साचणाऱ्या वस्तूंची नियमित स्वच्छता करावी. नागरिकांनी आठवड्यातून किमान एकदा अशा ठिकाणांची तपासणी करून पाणी साचू देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.महापालिकेकडून डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी अळीनाशक औषधांची फवारणी, डासांचा नायनाट करण्यासाठी धूर फवारणी (फॉगिंग), घराघरात सर्वेक्षण, जनजागृती मोहीम तसेच आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक औषध फवारणी नियमितपणे केली जात आहे. याशिवाय महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये संशयित रुग्णांची तपासणी आणि आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.महापौर रवि लांडगे म्हणाले, "पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेच्या उपाययोजनांसोबतच नागरिकांचे सक्रिय सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. ताप, अंगदुखी, उलट्या, जुलाब किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून पाणी साचू न देण्याची काळजी घेतल्यास संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल."

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले, "पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याने प्रत्येक नागरिकाने स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपायांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. घर व परिसरात पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे आणि ताप किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महापालिका प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवत असून नागरिकांनीही सक्रिय सहकार्य करून निरोगी, स्वच्छ पिंपरी चिंचवड घडविण्यास हातभार लावावा.

डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात करणे गरजेचे आहे. परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे तसेच वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे हीच सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरभर प्रतिबंधात्मक उपाय सातत्याने राबविण्यात येत असून नागरिकांच्या सहभागामुळेच निरोगी आणि स्वच्छ पिंपरी चिंचवडचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साध्य होईल असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यावेळी म्हणाले.

# पिंपरी चिंचवड महापालिका सेवक पतसंस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादितचा 54 वा वर्धापन दिन सोमवारी (दि. 13 जुलै 2026) संस्थेच्या कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त सभासदांसाठी अल्पोपहार व चहापान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.**



वर्धापन दिनाचे औचित्य साधून संचालक मंडळाची विशेष सभा घेण्यात आली. तसेच आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला नागरिक आणि सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंगुर्डे यांनी संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेत सभासदांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. महापौर रवीभाऊ लांडगे यांचा वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला चेअरमन शिवाजी येळवंडे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, सचिव विश्वनाथ लांडगे, खजिनदार अभिषेक फुगे यांच्यासह संचालक मंडळातील सनी कदम, नथा मातेरे, भास्कर फडतरे, चंद्रकांत भोईर, विजय नलावडे, अनिल लव्हन, विजय कांबळे, कृष्णा पारो, सदीप कापसे, योगेश रानवडे, विजय मुंडे, वैभव देवकर, विशाल भुजबळ, गणेश गवळी, युनुस पठाणीवाले, मनोज माठेरे, महादेव बोत्रे, दिगंबर चिंचवडे, धर्मेंद्र शिंदे, संजय कापसे, नंदकुमार इंदलकर, लाला गाडे, उमेश बांदल, मंगेश कलापुरे, विशाल बाणेकर, चंद्रशेखर गायकवाड, तुबार कसपटे, सूरज टिंगरे, दत्ता ढोरे, मदन चिंचवडे, किसान आरजे, प्रमोद अंबपकर, सुभाष ताकवले, भाऊसाहेब शेलार, किशोर आवाळा, गौतम पायाळ, गौतम भोयराव, राकेश चव्हाण तसेच माजी चेअरमन चारुशिला जोशी आणि नितीन समगीर आदी उपस्थित होते.वर्धापन दिनानिमित्त अनेक सभासदांनी पतसंस्थेला भेट देत संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. सभासदांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचे, पारदर्शक कारभाराचे आणि सुयोग्य कामकाजाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

# एस.टी. महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी. स्थानकात वृक्षारोपण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) 78 व्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी. स्थानक प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन, हरित विकास आणि वृक्षसंवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.**



यावेळी महापौर रवि लांडगे यांनी वृक्षारोपण करून उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. ते म्हणाले, "आज लावलेले प्रत्येक झाड हे उद्याच्या पिढीसाठी दिलेली अमूल्य भेट आहे. वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्याचे आपले स्वप्न निश्चितच साकार होईल."तसेच त्यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज व्यक्त केली. वृक्ष लागवड ही केवळ औपचारिकता न राहता त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील, स्थानक प्रमुख वैशाली कांबळे, कार्यशाळा प्रमुख राजगुरू, वाहतूक निरीक्षक कुलकर्णी, पर्यावरण जागर प्रतिष्ठानचे सचिव राजन जांभळे, अनंत तायडे तसेच एस.टी. महामंडळाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.एस.टी. महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करत प्रत्येकाने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश देण्यात आला.

# पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीच्या नेटवर्कवर ATS कारवाई

## पुणे-पिंपरी चिंचवडसह 23 ठिकाणी एकाचवेळी छापे;अनेक संशयित ताब्यात,डिजिटल उपकरणांची तपासणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे- पिंपरी चिंचवड, दि. 14 जुलै (प्रतिनिधी - युनूस खतीब) पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या नेटवर्कविरोधात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) मंगळवारी मोठी कारवाई केली. पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यभरातील 65 ठिकाणी एकाचवेळी छापेमारी करण्यात आली असून, त्यापैकी तब्बल 23 ठिकाणे पुणे जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे.**






ATS च्या पथकांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, चाकण (खेड तालुका), भोसरी, दिघी आणि तळेगाव दाभाडे परिसरातील विविध ठिकाणांवर शोधमोहीम राबवली. या कारवाईदरम्यान अनेक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या डिजिटल उपकरणांचीही सखोल तपासणी करण्यात आली.प्राथमिक तपासात शहजाद भट्टी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम आणि व्हॉट्सॲप यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तरुणांशी संपर्क साधून त्यांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या माध्यमांतून काही व्यक्तींशी संवाद साधून नेटवर्क विस्तारण्याचे प्रयत्न झाल्याची माहिती ATS च्या तपासातून समोर येत आहे.

राज्यव्यापी मोहिमेचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली असून, जप्त करण्यात आलेल्या मोबाईल फोन, संगणक, हार्ड डिस्क आणि इतर डिजिटल उपकरणांमधील माहितीचे विश्लेषण सुरू आहे. या तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, A T S कडून संबंधित संशयितांची कसून चौकशी सुरू असून, या प्रकरणातील नेटवर्कची व्याप्ती, आर्थिक व्यवहार आणि परदेशी संपर्क याबाबत तपास यंत्रणा माहिती गोळा करत आहे. प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असून पुढील काही दिवसांत आणखी कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 15/07/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहराच्या विकासाचा 'ॲक्शन प्लॅन' अभिषेक बारणेंनी दिले कानमंत्र

## • प्रभाग अध्यक्षांच्या कामकाजाला मिळणार गती - अभिषेक बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवड शहराच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी आणि प्रशासकीय कामकाजात अधिक गती आणण्यासाठी महापालिकेच्या दहा प्रभाग समिती अध्यक्षांची महत्त्वपूर्ण बैठक महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापतींच्या दालनात पार पडली. आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे आणि आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी नवनियुक्त प्रभाग समिती अध्यक्षांना कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शहराच्या विकासाची ध्येयधोरणे आणि लोकहिताची कामे गतीने पूर्ण करण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.**



या बैठकीस राजगड (प्रभाग 'अ') समिती अध्यक्ष अर्चना करांडे, सिंहगड (प्रभाग 'ब') अध्यक्ष मंदार देशपांडे, विजयदुर्ग (प्रभाग 'क') अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, देवगिरी (प्रभाग 'ड') अध्यक्ष सविता खुळे, शिवनेरी (प्रभाग 'इ') अध्यक्ष अर्चना सस्ते, तोरणा (प्रभाग 'फ') अध्यक्ष शिवानी नरळे, पुरंदर (प्रभाग 'ग') अध्यक्ष मनिषा पवार, प्रतापगड (प्रभाग 'ह') अध्यक्ष तृप्ती कांबळे, रायगड (प्रभाग 'ज') अध्यक्ष आरती चोंधे आणि लोहगड (प्रभाग 'ल') अध्यक्ष रेखा देवकर उपस्थित होते.

बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी प्रभाग अध्यक्षांना स्पष्ट सूचना देताना सांगितले की, नवनियुक्त प्रभाग अध्यक्षांनी पहिल्या आठवड्यात संपूर्ण प्रभागाची पाहणी करावी. यामध्ये नागरिकांचे आरोग्य, रस्ता रुंदीकरण, रस्ता दुरुस्ती, नाले दुरुस्ती, नाल्यावरील अतिक्रमण काढणे, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहराच्या विकासात लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असून, प्रत्येक प्रभागात 'हॉकर झोन' आणि 'पे-अँड-पार्क'साठी जागा निश्चित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अभिषेक बारणे यांनी प्रभागातील अत्यावश्यक नवीन कामे अंदाजपत्रकात तातडीने समाविष्ट करून घेण्यावर भर दिला. यामध्ये महापालिकेच्या हॉस्पिटलला भेट देऊन 'हेल्प डेस्क' तयार करणे, मोठ्या सोसायट्यांमध्ये 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'ची पाहणी करणे आणि शहरातील 32 प्रभागांत बोरवेलच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची (Recharging) मोहीम राबवण्याचे आदेश दिले. तसेच प्रभाग कार्यालयांत नागरिक सुविधा केंद्र, आधार कार्ड आणि एक खिडकी योजना कार्यान्वित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

महापालिकेच्या शाळांना भेटी देऊन तिथल्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे, वृक्षारोपणासाठी जागा निश्चित करणे आणि झाडांच्या बुंध्याभोवतीचे काँक्रिट काढून झाडे मोकळी करण्यावर भर दिला. पुलांखालील 'स्नॅक्स सेंटर्स'च्या ठिकाणची स्वच्छता राखून तिथे शौचालय व्यवस्था व्यवस्थित ठेवण्याचे निर्देश देत, प्रभाग अध्यक्षांनी पर्यावरणाचे रक्षण आणि बचतीसाठी इलेक्ट्रिक कारचा वापर करावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना सभापती अभिषेक बारणे यांनी केली.

या बैठकीत मिळालेल्या मार्गदर्शनामुळे प्रभाग समिती अध्यक्षांच्या कामकाजात एक नवीन दिशा मिळाली असून, पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हे पदाधिकारी आता अधिक जोमाने काम करण्यास सज्ज झाले आहेत. महापौर रवी लांडगे यांनीही सर्व पदाधिकाऱ्यांना प्रभागातील विकासकामांसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# महापालिकेची सॉफ्टवेअर प्रणाली आठ दिवसांपासून ठप्प

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची मुख्य सॉफ्टवेअर प्रणाली गेल्या आठ दिवसांपासून पूर्णपणे बंद असल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामकाजासह महापालिकेचे प्रशासकीय व्यवहार आणि महसूल संकलन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महानगरपालिका आयुक्तांना ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठवून तात्काळ हस्तक्षेप करण्याची आणि संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.**



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सॉफ्टवेअर प्रणालीच्या देखभालीची जबाबदारी असलेल्या कंत्राटदार कंपनी तसेच संबंधित आयटी विभागाकडून या तांत्रिक बिघाडाकडे गंभीर दुर्लक्ष करण्यात आले आहे. परिणामी जन्म-मृत्यू दाखले, विवाह नोंदणी प्रमाणपत्रे, मालमत्ता कर व पाणीपट्टी भरणे, विविध परवान्यांशी संबंधित सेवा आणि इतर अनेक ऑनलाइन सुविधा पूर्णपणे ठप्प झाल्या असून नागरिकांना आठ दिवसांपासून हेलपाटे मारावे लागत आहेत.

याशिवाय महापालिकेच्या अंतर्गत फाईल्सची देवाणघेवाण, ई-गव्हर्नन्स प्रणाली आणि दैनंदिन कार्यालयीन कामकाजावरही मोठा परिणाम झाला असून अनेक विकासकामांचे निर्णय व अंमलबजावणी रखडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ऑनलाइन कर संकलन बंद असल्यामुळे महापालिकेच्या महसूलावरही मोठा परिणाम होत असून कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

**नगरसेवक संदीप वाघेरे यांनी आयुक्तांकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:**

•बंद पडलेली सॉफ्टवेअर प्रणाली युद्धपातळीवर तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात यावी.

•करारातील अटींचा भंग करणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करून आवश्यक असल्यास काळ्या यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.

•कामावर योग्य देखरेख न ठेवणाऱ्या व कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

"नागरिकांना मूलभूत सेवा देण्यात सातत्य राहणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.

आठ दिवसांपासून संपूर्ण प्रणाली बंद राहणे ही अत्यंत गंभीर बाब असून यासाठी जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे," असे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.

या गंभीर प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून महानगरपालिका प्रशासनाने याप्रकरणी तातडीने उपाययोजना करून सेवा पूर्ववत सुरू कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधूनही होत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968